

# श्री नारायण स्तवराज !


संपादक : गुं. फ. आजगांवकर



# श्री नारायण स्तवराज !



संपादन — गुं. फ. आजगांवकर




(परिसराचा नकाशा)

# सादर समर्पण—




कै. तुकाराम लक्ष्मण देसाई



श्रीमती राधाबाई देसाई


# ॐ नमो नारायणाय !






गुं. फ. आजगांवकर



हल्ली **लक्ष्मी नारायण** या नावाने ओळखले जाणारे देवस्थान कुडाळपासून थोड्या अंतरावर **वालावली** ह्या गावी विख्यात आहे. वालावलीचा उल्लेख तीर्थक्षेत्र म्हणून करतात. हे देवस्थान किती प्राचीन आहे हे सांगणे कठीण आहे. सबंध कोकणपट्टींत ह्या देवालयाची किंवा येथील नारायणमूर्तीची तुलना करतां येणार नाही. अनेकांना ह्या परिसरावर व देवालयाच्या आंतील भागावर विचार पूर्वक संबंध शोधावे लागतील. मूर्तीचे शिल्प गुप्तकाल व चालुक्य कालाशीं संबंधीत आहे. '**श्रीनारायण देव**' हा शिक्का हे नारायणाचे देऊळ आहे हे स्पष्ट करतो. चंद्रभान व सूर्यभान प्रभू देसाई यांनी देवाला अर्ध्या गांवचे उत्पन्न खर्चासाठी कायम दिले आहे. भानजी प्रभू सरदेसाई, कुडाळ प्रांताचे प्रमुख यांचा शिक्का उपलब्ध आहे. त्यांत **श्री नारायण प्रसन्न भानजी प्रभू सरदेसाई** असा स्पष्ट उल्लेख आहे. यावरून देऊळ नारायणाचे आहे यांत वाद नाही. आमचे मित्र कै. आत्माराम

रामचंद्र देसाई यांनी '**श्रीदेव नारायण वालावली**' ह्या नावाची एक लेखमाला **गौडब्राह्मण** त्रैमासिकांत लिहिली होती. सुमारे शंभर पृष्ठांचा एक ग्रंथच त्यांनी लिहिला होता. पण तो पुस्तकरूपाने प्रकाशित न झाल्यामुळें त्याचा लोकांना लाभ होऊं शकला नाही. सुमारे दहा हजार रुपयांचा प्रकाशनासाठी खर्च आहे. कोणी दानशूर याचा विचार करील का ?

देवाच्या उजव्या बाजूस लक्ष्मी व डाव्या बाजूस पक्षांचा राजा गरूड आहे. भारतीय संस्कृतीत, वेद व पुराणे, यामध्ये गरूडाला अत्यंत पवित्र म्हणून मानला आहे. श्रीनारायणाचें ते वाहन आहे. गरूड हा कश्यप व विनता यांचा प्रतापी पुत्र, व वरुणाचा लहान भाऊ, गरुडाने सुद्धा आकाशांत अगदी सूर्यापर्यंत भरारी मारली होती. गुप्त सम्राटांच्या काही नाण्यावर गरुडध्वजाचे चिन्ह आढळते. महानारायण उपनिषदांत गरुड गायत्रीचा उल्लेख आढळतो. गरुड हे प्रभुसत्ता, वर्चस्व आणि महान अधिकाराचे चिन्ह म्हणून रोमन कालापासून प्रसिद्ध आहे. आपल्या हवाईदलाचे अधिकारी हे चिन्ह वापरतात. श्रीदेव नारायणाच्या डाव्या बाजूस उभा असलेला गरूड प्रभू सत्तेचे निदर्शक आहे. श्रीनारायणाचा जो मुकुट आहे तो पराक्रमी गोम प्रभूचा. हा १२ व्या शतकांत होऊन गेला. संपूर्ण कोकण प्रांत त्याच्या अधिपत्याखाली होता.

## क्षेत्र वालावली

दक्षिण कोकण भागांतील साक्षात भूवैकुंठ म्हणून श्रीक्षेत्र वालावली गांवचा उल्लेख केला जातो. येथे श्रीदेव नारायणाचे प्रख्यात देवालय आहे. 'मुडयाचा कोन' ह्या ग्रामविभागात 'नारायण तीर्थ' नावाच्या सुंदर तलावाच्या काठीं श्रीदेवाचे देवालय बांधले आहे. तलावाचे तिन्ही बाजूस वृक्षांची दाटी आहे. चौथ्या बाजूस श्रींचे भव्यमंदिर उभे असून देवालयाचे चारी बाजूस भक्तजनांस रहाण्याकरतां बांधलेल्या धर्मशाळा आहेत. ज्या बाजूस तलाव आहे ती जागा वगळतां, तिन्ही बाजूस दगडाची भिंत आहे. ह्या भिंतीस तीन मोठे दरवाजे आहेत. महाद्वार पूर्वाभिमुख असून ते ओलांडून आंत पाऊल टाकल्यावर देवालयासमोरील दीपमाळ दृष्टीस पडते. तिचे मागें देवालयाचा विस्तीर्ण सभामंडप, त्यामागें मुखशाळा व मुखशाळेमागे आंतील सभामंडप व गर्भागार दृष्टीस पडते. ह्या गर्भागारांत लक्ष्मी व गरुड सहित श्री नारायणाची चतुर्भुज सुंदर मूर्ति दृष्टीस पडते. तीनही भागांची लांबी सुमारे १५० फूट आहे. देवालयाचे गर्भागार व मुखशाळा यांची बांधणी प्राचीन आहे. सभामंडपाचे काम अर्वाचीन आहे. देवालयाच्या लाकडी बांधणीची डागडुजी पुष्कळवेळा झालेली आहे.

— o —

## लक्ष्मीपतेः मंगलम्

शोभे सायुध कांति रम्य मुकुटें गंधादिकें रेखिला।
पायीं लक्ष्मी, गरूड, देव न दुजा ऐसा कुठें देखिला॥
आहे चित्रित राउळीं विभु उभा भक्तांचिया दर्शना।
तो नारायण वालवलिंचा लक्ष्मीपतेर्मंगलम् ॥ १ ॥
ज्यातें पाहुनि तहानभूक न विरे, वाटे पहावा पुन्हा।
त्याचें चिंतन भुक्तिमुक्तिद सदा, आनंदवी सज्जना॥
जो का मोहन मोहि कोटि सदना लावण्य रूपें प्रभू।
तो नारायण वालवलिंचा लक्ष्मीपतेर्मंगलम् ॥ २ ॥
झाले पुण्यपुरुप आणि नृपती वा टोपिवाले कुणी।
त्या पुण्याचरणें चिरस्मृति अहा। आहेच नारायणीं॥
जो नारायण कारणीं तनुमन द्रव्यादि ओपी सुखें।
त्याची शास्वत कीर्ति भूवरि उरे—लक्ष्मीपतेर्मंगलम् ॥ ३ ॥

## महाद्वारीं

कोणी कसाही कुठुनी देवाच्या प्रथम ये महाद्वारी
तरी तो म्हणेल गमतें निसंशय पातलो हरिद्वारीं ॥ १
टुमदार पेठ, पिंपळ, सभोवतीचीं लहानशीं सदनें
हरिमंदिरास शिखरें मोहविती कशुं कितीक या वदनें ॥ २
रंगित शीला द्वारा अत्युत्तम कोरिली असे नक्षी
फिरती तेविं चहुकडे मंजु—ध्वनि करित कितीतरी पक्षी ॥ ३
जाता पुढे जरासे स्वाभाविक रम्य देउळे गमती
कौशल्यपूर्ण त्यांची कारागिरी बघुनि होय थक्क मती ॥ ४
शतकें किती जरी त्यां होउनि केव्हांच लोटली असती
तरि अजुनि तितकी जुनी करणीने प्रेक्षकां न ती दिसती ॥ ५
पूर्वींचे कारागीर कुशल तसे धोरणीहि बहु होते
मेले कीर्तीसाठी, जाती स्वर्गास अंति नर हो, ते ॥ ६
आतां धनिक गुणी मरमर मरतील फक्त संसारा
करितिल काय परीतें द्रव्यर्थचि वेळ दवडुनी सारा ॥ ७
कल्याण मठी मारुति वृंदावन, पंचदीप माला त्या
दुमजलि पथिकाश्रम तर रुग्णालयहि वाचनालया जा त्या ॥ ८
विलसे चंपक तरुतलि काशीकर वैद्य सजवी देऊळ जे
पढती तैं श्रुति वैदिक, मुरलिधराच्या कृपा प्रसाद रजें ॥ ९

पुष्पफलोद्यानें मन हरिती सुवासे तसेच सौंदर्ये
वर्णूं काय तयां मी ? टेकावे हात तेथ कविवर्यें ॥ १०
दक्षिण दिग्भागीं ' श्रीनारायण तीर्थ ' नामक तलाव
सित लोहित पद्मांही शोभे यज्जल म्हणे तृषित 'लाव' ॥ ११
पाया कुष्ठ गदांतक अघहर शुचि तोय ते बघुनी घांटी
स्नाना धुण्या नरांची, ललनांची फार होतसे दाटी ॥ १२
विप्रां, शूद्रां, गोपां, महिलां, वारांगनास दोषिजनां
जागा ठरवुनि दिधल्या तेणे कितीतरी गमे प्रशस्त मना ॥ १३
उत्तर दरवाजावरि नगारखाना सदना छत्र वसे
पश्चिम दरवाजाशीं स्वाश्रमरत विप्रवर्ग तो निवसे ॥ १४
मोहक विविध तसबिरी खचित सभामंडपास शोभविती
यद्दर्शनें स्मरुनि बहु हरिलीला प्रेमलहरी हृदयीं विती ॥ १५
चौकांतील छतांच्या दिग्पतिना वा दशअवतारांस ॥
काष्ठविनिर्मित देखुनि आश्चर्य गमेल सान थोरांस ॥ १६
देवाचा दरवाजा स्तंभ तसे द्वारपाल ते भव्य ॥
पाहुनि पाषाणांचे कुशलांचे चिंतिती सुजन मव्य ॥ १७
कलिमल हारक चालक जगताचा स्थित असून गाभारी ॥
लक्ष्मी पथ भक्तांचा जो रविसम दुर्जना–नगां भारी ॥ १८
कितिसे भक्तिरसाची येउनि आंघोळ घालतील मला ॥
म्हणुनि उभा किंवा तो हरण्या निज दर्शनेंचि पतित–मला ॥ १९
दक्षिणभागीं लक्ष्मी उत्तरभागीं तसा गरुड ज्याचे ॥
तो नारायण नमितां चुकविल फेरे सहस्र जन्मांचे ॥ २०
सुंदर सुहास्य मुख तो नारायण पाहतां षडरिपु पळती ॥
तृष्णा क्षुधा न बाधे लाधे सद्धर्म इंद्रियें वळती ॥ २१
शोभे, किरीट शिर्षी विलसति कानात कुंडलेंहि तशी ॥
कंठीं पुष्कळ माळा पुष्पे ज्यांतिल बरी सुगंधितशीं ॥ २२
चंपक, गुलाब, बकुळी, शेवंती, पारिजातक सुरंगी ॥
मालति, अगस्ति, केतकी, कोरंटी, कमल जाईजुई रंगी ॥ २३
आपाद तुळसिमाला रुळे मजेदार चर्चिले गंध,
चक्र, गदा, शंख कमल करिं धरी अरिचा नुरावया गंध ॥ २४
कटि–तटि परिधान करी पीतांबर शाल पांघरी वरती ॥
छाया धरि फणि, नसतां ताप कशाचाहि अशि तदीय रती ॥ २५
अष्टदीप जळती तत्तेजें बहु चकचके प्रभावळ ती ॥
तेणे विशेष शोभे नारायण भजक दर्शना खिळती ॥ २६

— o —

# श्री नारायण स्तवराज

## ( मिलिंद माधव विरचित )

ॐ श्री नारायणाय नमः ॥ ॐ नमो गजवदना । गणराया गौरीनंदना । विघ्नेशा भवभयहरणा । नमन माझें साष्टांगी ॥ १ ॥ नंतर नमिली श्रीसरस्वती । जगन्माता भगवती । ब्रह्मकुमारी वीणावती । विद्यादात्री विश्वाची ॥ २ ॥ नमन तैसे गुरुवर्या । सुखनिधान सद्गुरुराया । स्मरुनी त्या पवित्र पायां । चित्तशुद्धि जाहली ॥ ३ ॥ थोर ऋषीमुनी संतजन । नवनाथ, नवनारायण । नक्षत्रे, राशी, सर्वग्रहगण । नमन माझें सकलांसी ॥ ४ ॥ मन स्थिर एकाग्र केलें । नारायण स्तवराज स्तोत्र आरंभिलें । देवाचें रूप हृदयीं साठविलें । तेणें आली प्रसन्नता ॥ ५ ॥ ॐ नमो श्री नारायणा । आदितत्त्वा सनातना । हे प्रभो शेषशयना । जगज्जीवना जगदीशा ॥ ६ ॥ तूं अससी सर्वकर्ता । तूं अससी सर्वभर्ता । कर्ता, भर्ता, हर्ता । तूंच देवा दयाघना ॥ ७ ॥ हे परब्रह्म तूं परमात्मा । तव पराक्रमा नसे सीमा । पुण्यप्रकाश नुरवी तमा । ब्रह्मांडा तेज पुरविसी ॥ ८ ॥ देवा तूं नाहीस वैकुंठसदनीं । नससी तूं योगीयांच्या ध्यानी । जेथे भक्त डोलती तव भजनीं । तिथें उभा तूं नारायणा ॥ ९ ॥ पंचमहाभूतें तूंच निर्मिली । तुझ्यामुळेच आकारा आलीं । तुझी सहस्र नामावळीं । 'नारायण' नामीं सामावली ॥ १० ॥ न जाणे मी आवाहन । न जाणे पूजन भजन । तरीहि धरिले तव चरण । नको मला अव्हेरू ॥ ११ ॥ नित्य नेमें जीवें भावें । तुझेच एक नाव घ्यावे । एवढेच मज एक ठावे । नारायणा, भगवंता ॥ १२ ॥ घेऊनी दहा अवतार । दुष्टांचा केला संहार । संतसज्जनांचा घेसी कैवार । ऐसी कीर्ति तुझी असे ॥ १३ ॥ स्वतः स्वतःसी ओळखणे । म्हणजेच सत्य ज्ञानी होणे । तुज भजणे अनन्यपणे । याचेच नांव भक्ति असे ॥ १४ ॥ तुझी भक्ति भावप्रधान । किंवा असो ती कर्मप्रधान । तिने सर्वांचे अंतकरण निर्मळ खास होतसे ॥ १५ ॥ तुझ्या कृपेने तरले अनेक । तव नामस्मरणे अनेकानेक । विष्णुसहस्रनामात एक । '**नारायण**' नाव गोड ते ॥ १६ ॥ तव नामाचा थोर महिमा । न जाणे प्रत्यक्ष ब्रह्मा । नाममाधुरीसी उपमा । अमृताचीही उणी असे ॥ १७ ॥ तुझ्या मंदिराची रचना । आणि तुझी प्रतिष्ठापना । यांची माहिती नसे कोणा । अंदाजमात्र अनेक ॥ १८ ॥ तुझा रम्य क्षीरसागर । आणिक दिव्य वैकुंठनगर । परि आवडलें वालावलीपुर । उभा तेथे राहसी ॥ १९ ॥ तुझ्याचमुळे भोवती जमला । पांच-बारांचा अवघा मेळा । तूंच गावाचा सर्व गाडा । चालविसी सुखासमाधानाने ॥ २० ॥ कवि, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन । आविर्होत्र, द्रुमिल, चमस, करभाजन । ऐसे महा नवनारायण । तूंच स्वयें नटलासी ॥ २१ ॥ म्हणत 'नारायण, नारायण' । नारदमुनि करी त्रिलोकीं भ्रमण । गरुड,

लक्ष्मी सन्निध राहून । दर्शन सुख अनुभवती ॥ २२ ॥ देवा, कायिक, वाचिक, मानसिक । ऐसी पापे घडती अनेक । ती हराया तूंच एक । समर्थ असती दयाळा ॥ २३ ॥ रात्र असो वा असो दिवस । रक्षावे तूंच आम्हांस ! तुझे ते दिव्य सुदर्शन खास । आम्हां भोवती फिरावे ॥ २४ ॥ पूर्व आणि पश्चिमेकडून । दक्षिण आणि उत्तरेकडून । वरून आणि खालून । रक्षावें दाही दिशांनी ॥२५॥ आधी तुझे नांव घेतो । मग पुढे पाऊल टाकतो । पाठीराखा नारायण असतो । हेच श्रद्धाबळ माझे ॥ २६ ॥ वालावलीचा राजाधिराज । त्याचा ग्रंथ नारायण स्तवराज । लिहुनी कवि मिलिंदमाधव आज । संतोष फार पावला ॥

(ता. ४ ऑक्टोबर १९८६) ॐ नारायणार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥ ॐ विष्णवे नमः विष्णवे नमः विष्णवे नमः ॥ [ सर्व हक्क श्री. गुं. फ. आजगांवकर, १७ के. जी. बि. निवास, मॅजेस्टिक समोर, मुंबई नं. ४००००४ यांचे स्वाधीन. ]

[ सूचना : हे स्तोत्र, नारायण–भक्त स्त्रीपुरुषांनी तोंडपाठ करून, स्नानाचे-वेळी स्पष्ट उच्चारांसह म्हणावे. ]

— ० —

# श्रीदेव नारायण वालावल

[ उच्च कमलासनावर **श्री नारायणाची** भव्यमूर्ति असून उजव्या बाजूस **लक्ष्मी** व डाव्या बाजूस गरूड अशा तिन्ही मूर्ती एकाच अखंड पाषाणाच्या कोरलेल्या आहेत. श्रीच्या दोन्ही बाजूस प्रत्येकी चार चार असे आठ नंदादीप अखंड तेवत असतात. ही मूर्ती श्री विष्णूच्या केशवादि चौवीस मूर्तीपैकी सोळावी अनिरुद्धाची मूर्ती आहे असे कित्येकांचे म्हणणे आहे. ]

अनिरुद्धो नीलवर्णः शंख पद्म गदारिभृत ॥
वामोर्ध्व करे शंखो वामाधः करे पद्मम्
दक्षाधः करे चक्रं दक्षोच्च करे गदा ॥

श्री वैकुंठ निवास माधव जगत्कर्ता प्रहर्ता हरी !
होता विश्वपटांत तंतु परि तो विश्वस्वरूपे धरी
भक्तानुग्रह कारणे प्रतियुगी दावी स्वनामावली
तो **नारायण** पावला निजसुखा लागोनि **वालावली !**
झाला मत्स्य जलांत कांसव वनी वाराह सिंहाकृती ।
तैसा वामन विप्र भार्गव वनी श्रीराम सीतापती ॥
होता कृष्ण न गोकुळांत हृदयी संतोषता पावली ।
तो नारायण पावला निजसुखा लागोनि वालावली ॥
निरूपयानी वेदान्ताः यदेकं चिन्मयं महा ॥
नारायणाख्यं तद् ब्रह्म **वालावल्यां** स्थितं भजे

**आर्या :** श्री वैकुंठ निवासी नटला, जो विश्वरूप परमेष्ठी
तंतु जसा परिं तैसा राहे व्यापुनि चराचरा सृष्टी ॥
नाशार्थ दुष्कृतांच्या सद्रक्षण कारणार्थ अवतरुनी ॥
रक्षा निज भक्तांते प्रेमे दुष्टांसि सर्व संहरुनी ॥
भूरक्षणार्थ झाला मत्स्य जळी कूर्मही वराह वनी ॥
नरहरि वामन, भार्गवरूपे जो घेइ साधुंच्या अवनी ॥
हननार्थ राक्षसांच्या घेऊनियां रामरूप अवतरला ॥
श्रीकृष्ण नंदनंदन झाला ज्या गाउनी सुजन तरला ॥
निर्गुण रूप हरि प्रभू ऐसी घे सहवनी सगुण रूपें
वालावली स्थळी तो प्रगटे नारायणाख्य सद्रूपे ॥

— ० —

# वालावली क्षेत्र वर्णन

चराचर अगा जरि प्रभु असे पहा व्यापुनी ।
क्वचित् स्थलिं विशेष तो परि दिसे जशी स्वर्धुनी ॥
जगांत असती स्थळे अमित जी दुजी चांगली ।
गमे मज अशातले स्थलहि एक **वालावली** ॥
असे तर जिथे तिथे अढळ डोंगरांचा बरा ।
करी चढउतार तो परि जिवास कीं घाबरा ॥
मधून बघतां जरा सहज त्या वनश्रीकडे ।
गमे तुडविणे बरे सतत डोंगरांचे कडे ॥
कपित्थ, वट, तितिणी पनस, नारळी पोफळी ।
औदुंबर सीताफळी पळस जंबू चूतावली ॥
अशोक रुइ लिंबिणी बकुळि कर्दळी, शाल्मली ।
खुले विविधता द्रुमें अशि विशेष वालावली ॥
हरी कधितरी इथे प्रगटणार बुद्ध्या स्वये ।
म्हणुन वनदेवीला अननुभूत उल्हास ये ॥
तनूवरुनि ओढणी हिरवि चार ओढून ती ।
करीत गुणगायना स्मरत राहिली श्रीपति ॥
अनेक असुखें भवीं चिकटुनी मनुष्या स्वये ।
क्षणोक्षणी पुसावया नयन लाविती तैं तये ॥
जरी सहज सेविलें वन तरी क्षणी तो हसे ।
असे स्थल महत्व त्या सुखद सर्वदा होतसे ॥
वने, उपवने, तरू, गिरिगुहा, नद्या गोकुळे ।
लताभवन, कुट्टिमे, खग, पशू, मठी, देऊळे ॥

सुगंधयुत वायुच्या लहरि निर्झरांचे ध्वनि ।
प्रसन्न करिती न का ? व्यथित चित्त संगे क्षणी ॥
निसर्गरचना जग प्रथित थोरवी ऐकवी ।
स्थला विषयीं त्या तरी कवण मान ना डोलवी ? ॥
जडासही गमे वसों तर अशाच पुण्यस्थली ।
गमे मज अशांतली खचित एक **वालावली** ॥
देसाई नाम पूर्वी क्षितिपति बरवे जाहले, सूर्यभान ।
त्यांही उत्पन्न अर्धे हरिस वितरिले गांवचे अन्यथा न ॥
खर्चाची सुव्यवस्था तशी करुनि दिली अव्यवस्था हराया ।
साधो तू धन्य लोकी कृति करुनि **कुडाळेश्वरा** धन्य राया ॥
संपत्ती प्राप्त झाली तरि तिज सुकृतीं लावण्यासी सुबुद्धी ।
एकाकी होत नाहीं घडाले तरि घडे पूर्वभाग्यें सुबुद्धी ॥
आला बाहेर गेहीं जरि कुणि दुबळा भीक मागावयाला ।
साहेना तोहि ज्या तो खल धनिक गृही जन्म घेई कशाला ॥
ज्याचे ज्या पूर्वजन्मी ऋण धन जितुके घ्यावया तेवढे तो ।
या जन्मी दैवयोगे बहुपरि धरुनि वेष तेथेच येतो ॥
ज्याचे त्या घ्यावयाचे त्यजुनि उगिच कां बाळगावी दुराशा ।
देणे कोणा चुकेना शुनकसम पुढे मारितो द्वारि माशा ॥
कष्टे देऊन थोडे जरि मग कळवी स्वीय दातृत्व वाचे ।
किंवा एका तिळाने उगि सतत बसे तर्पणा तत्कुळाचे ॥
ऐशा मुद्रांपरी तो कृपण किमपि ना भूपती **सूर्यभान** ।
त्याच्या ह्या दान शौर्या परिसुनि विसरे धीट श्रीमंत भान ॥
देवाचे कार्य सारे रविशशि असती तोंवरी नित्य व्हावे ।
या इच्छेने कितिकां बहुत वितरिल्या वृत्ति या प्राज्ञरावें ॥
तारेसाठी विण्याच्या, कपिल करुनियां लावण्याला मृदंगा ।
अंगाऱ्याला धुपाच्या हरिवरि धरण्या धार आणुनी गंगा ॥
माला देवा वहाया वतन वितरिलें काय आतां कथावे ? ।
थोरांचे थोर सारे समजुनि सुजनीं यातले सार घ्यावें ॥
आजोबाने दिलेले वतन अलिकडे घ्यावया नातु पाहे ।
तो कां देईल कोणा तिळ उचलुनियां आस ही व्यर्थ आहे ॥
द्रव्याने थोर झाला तरि सुजन न कदा थोर त्या मानताती ।
सद्धर्मीं चित्तवृत्ती अचल गिरीसम ख्याति त्यांची दिगंती ॥
सत्कर्मीं द्रव्य ज्यांचे चुकुनिया नच घे ओढ तें कासयास ।
अंती ते नाश पावे अवचित न मिळे यास किंवा परास ॥

— ० —

# ॥ श्री नारायणाष्टक ॥

परब्रह्म जे व्यापुनी विश्व राही ।
निराकार ज्या नामरूपादि नाहीं ॥
धरी रूप साकार वालावलीला ।
नमस्कार त्या **देव नारायणाला !** ॥ १ ॥
करीं आयुधे शंखचक्रादि दिव्य ।
शिरीं कीरिटी कुंडले युक्त भव्य ॥
करी पद्मजा पादसंवाहनाला ।
नमस्कार त्या देव **नारायणाला** ॥ २ ॥
कुडाळेश झाले प्रभु बंधु दोन ।
सुविख्यात ते चंद्रभान् सूर्यभान ॥
तयीं आणुनी मंदिरीं स्थापियेला ।
नमस्कार त्या **देव नारायणाला** ॥ ३ ॥
मिळे वैभवा श्रीपतीच्या कृपेच ।
म्हणोनी बहू भूषणें शीरपेच ॥
समयी प्रभू देई भूदान ज्याला ।
नमस्कार त्या **देव नारायणाला** ॥ ४ ॥
विठो भेट दे तुलसिहार ज्याचा ।
प्रती भेटिला ये बुका विठ्ठलाचा ॥
असा नेम हा वार्षिकी रूढ झाला ।
नमस्कार त्या **देव नारायणाला** ॥ ५ ॥
भजे देवरायासि जो भक्तिभावे ।
तया भक्त कैवारी हा नित्यपावे ॥
करी पूर्ण भक्तांचिया कामनेला ।
नमस्कार त्या **देव नारायणाला** ॥ ६ ॥
जया सेवितां संकटे दूर होती ।
हरे भूतबाधा, लया रोग जाती ॥
प्रभु भुक्ति मुक्तिहि दे सेवकाला ।
नमस्कार त्या **देव नारायणाला** ॥ ७ ॥
नको द्यावया अन्य तीर्थासी भेटी ।
घडे पुण्य वालावलीं तेच गांठी ॥
अधिष्ठान तीर्था मिळे यत्पदांला ।
नमस्कार त्या **देव नारायणाला** ॥ ८ ॥

(कै. बाळकृष्ण अनंत पाटील–पाट)

# श्रीदेव नारायण स्तोत्रम्

( पांडवगीता )

ब्रह्मोवाच ॥ ये मानवा विगतरागपरावरज्ञा । नारायणं सुरगुरुं सततं स्मरंति ॥ ध्यानेन तेन हतकिल्बिषचेतनास्ते । मातुः पयोधररसं न पुनः पिबंति ॥

इंद्र उवाच ॥ नारायणो नाम नरो नराणां । प्रसिद्धचोरः कथितः पृथिव्याम् ॥ अनेक जन्मार्जित पापसंचयं । हरत्यशेषं स्मरतां सदैव ॥

धृष्टद्युम्न उवाच ॥ श्रीराम नारायण वासुदेव । गोविंद वैकुंठ मुकुंद कृष्ण ॥ श्रीकेशवानंत नृसिंह विष्णो । मां त्राहि संसार भुजंगदस्टम् ॥

संजय उवाच ॥ आर्ता विषण्णाः शिथिलाश्च भीता । घोरेषु व्याघ्रादिषु वर्तमानाः ॥ संकीर्त्य नारायण शब्दमात्रं । विमुक्तदुःखाः सुखिनो भवंति ॥

अक्रूर ॥ अहं तु नारायणदास दास, दासस्य दासस्य च दासदासः ॥ अन्येभ्य ईशो जगतो नराणां, तस्मादहं चान्यतरोऽस्मि लोके ॥

अश्वात्थामोवाच ॥ गोविंद केशव जनार्दन वासुदेव, विश्वेश विश्व मधुसूदन विश्वनाथ ॥ श्रीपद्मनाभ पुरुषोत्तम पुष्कराक्ष, नारायणाच्युत नृसिंह नमो नमस्ते ॥

धृतराष्ट्र उवाच ॥ नमो नमः कारणवामनाय, नारायणायामित विक्रमाय ॥ श्रीशंख चक्रान्गदाधराय नमोऽस्तु तस्मै पुरुषोत्तमाय ॥

लोमहर्षण उवाच ॥ नमामि नारायणपादपंकजं, करोमि नारायण पूजनं सदा ॥ वदामि नारायणनाम निर्मलं, स्मरामि नारायण तत्वमव्ययम् ॥

गर्ग उवाच ॥ नारायणेति मंत्रोऽस्ति वागस्ति वशवर्तिनी ॥ तथापि
नरके घोरे पतंतीत्येत दद्भुतम् ॥

दाल्भ्य उवाच ॥ किं तस्य बहुभिर्मंत्रैर्भक्तिर्यस्य जनार्दने ॥ नमो
नारायणायेति मंत्रः सर्वार्थसाधकः

पौलस्त्य उवाच ॥ हे जिव्हे रससारज्ञे सर्वदा मधुरप्रिये ॥
नारायणाख्यं पीयूषं पिब जिव्हे निरंतरम् ॥

श्रीशुक उवाच ॥ आलोक्य सर्वशास्त्राणि विचार्यैवं पुनः पुनः ॥
इदमेकं सुनिष्पन्नं ध्येयो नारायणः सदा ॥


श्रीमहादेव उवाच ॥ शरीरं च नवच्छिद्रं व्याधिग्रस्तं कलेवरम् ॥
औषधं जान्हवीतोयं वैद्यो नारायणो हरिः ॥

आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ॥
सर्व देव नमस्कारः केशवं प्रतिगच्छति ॥

— ० —



कृष्णाच्या भूमिकेंत
माधवराव वालावलकर



श्रीदेव आदिनारायण
परुळे

# : आमची प्रकाशने :

१) **वा. रा. ढवळे व्यक्ती आणि कार्य**–संपादक : गुं. फ. आजगावकर पृष्ठे १४० किं. ३० रु.

२) **नटवर्य माधवराव वालावलकर** : किं. २५ रु., पृष्ठे १६०

३) **क्रांतीपराग** (काव्यसंग्रह) प्रस्तावना सदानंद रेगे किं. १० रु.

४) **प्राचीन मराठी संतकवी** : भाग २, ३ महाराष्ट्र भाषा भूषण ज. र. आजगांवर पृष्ठे १००० किं. ६०

५) **भारतातील शास्त्रांचा उद्‌गम व विकास** : पृष्ठे ३२०

६) **सेनापती भोसले** : किं. १० रु. गुं. फ. आजगावकर

७) **आजगांव दर्शन** : किं. १० रु. गुं. फ. आजगावकर

८) **वालावल दर्शन** : किं. १० रु. गुं. फ. आजगावकर

९) **संरक्षण शास्त्र व तंत्र** : कॅ. मा. कृ. शिंदे ३० रु.

१०) **कुडाळ देशकर** : खंड १ ते ३ किं. ५० रु.

११) **जीवन झाला नाव** : कि. १० रु.

१२) **प्रसिद्ध पुरुषांच्या अप्रसिद्ध गोष्टी** : किं. २० रु.

१३) **नटवर्य परशुराम सामंत** : किं. ३० रु.

१४) **स्वरभूषण वसंत देसाई** : गुं. फ. आजगांवकर किं. २ रु.

१५) **माझी वाटचाल** (आत्मचरित्र) : डॉ. नाईक १५ रु.

१६) **गुं. फ. आजगांवकर** (चरित्र) : किं. १० रु.

१७) **स्वानंद लहरी** ले. स्वामी चिदानंद संपादन–गुं. फ. आजगांवकर

१८) **अनंत शिवाजी देसाई टोपीवाले** : किं १० रु.

१९) **माऊली माझी–कृपेची साऊली** : ले. स. फ. आजगांवकर किं. १० रु.

२०) **सोऽहम् ध्यान तरंग** ले. सद्‌गुरु प्रभू किं. २ रु.

२१) **ओवी नामामृत सार** (रामनाम महात्म्य) सद्‌गुरु प्रभु किं. २ रु.

२२) **'भाव माझ्या अंतरीचे'** (कविता संग्रह) : सद्‌गुरु प्रभु किं. ५ रु.

२३) **'आत्मसंवाद'** : सद्‌गुरू प्रभु किं. २ रु.


२४) श्री. **देव वेतोबा स्तवन मुक्तावली** : सद्‌गुरु प्रभु किं. २ रु.

२५) **दत्तावतार वासुदेवानन्द सरस्वती** (एकध्यायी ओवी चरित्र) किं. २ रु.

२६) **श्रीदेवी सातरी स्तोत्र** किं. २ रु.

**बॉम्बे बुकडेपो : गिरगांव मुंबई ४.**

**पत्ता** : गुं. फ. आजगांवकर
१७ के. जी. बी. निवास
मॅजिस्टिक समोर, गिरगांव, मुं. ४.



**ब्रह्मीभुत आनंदनाथ महाराज वालावलकर**

जिवंत समाधि : वेंगुर्लें कँप १९०४

अक्कलकोट स्वामी समर्थांचे हे शिष्य. '**आनंद लहरी**' सन १८८८ व **भजनानंद लहरी** सन १९१२ मध्ये प्रकाशित. दोन हजार अभंग अप्रकाशित आहेत. त्यांच्या समाधीची व मठाची व्यवस्था आजतागायत चालू आहे.

---

संपादक : प्रकाशक : **गुं. फ. आजगांवकर**, १७, के. जी. बी. निवास, मॅजेस्टिक समोर, गिरगांव, मुंबई–४०० ००४.

मुद्रक : **वि. ज. देसाई**, वैभव प्रिंटींग प्रेस, २७३ व्ही. पी. रोड, मुंबई ४.

**मार्च १९८८**] [**किंमत ५ रुपये**